# नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, ८ वा मजला, बेलापूर भवन सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक ११/११/२०१३.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **नोव्हेंबर महिन्याची सर्वसाधारण सभा, मंगळवार, दिनांक १९ नोव्हेंबर २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता** नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील ७ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. इतिवृत्त कायम करणे.

२. प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

३. घणसोली प्र.क्र.१८ येथील निब्बाण टेकडी व पंचशीलनगर परीसरातील रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

**ठरावाच्या सूचना :**

**४. श्री. सुरेश गोपाळ शेट्टी, यांजकडून :-**

प्रत्येक विभाग कार्यालय क्षेत्रातील हॉटेल व इतर व्यावसायीकांची संख्या आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'परवाना अधिकारी' हे पद विभाग अधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली असणे आवश्यक आहे. सध्यस्थितीत उपआयुक्त (परवाना) यांच्या अधिपत्याखाली एकच परवाना अधिकारी काम करीत आहे. त्यामुळे हॉटेल व्यावसायीक व इतर व्यापाऱ्यांची गैरसोय होत आहे. प्रत्येक विभाग कार्यालयात एक परवाना अधिकाऱ्याची नियुक्ती करणे.

**५ ते ७. श्री. भोलानाथ महादू ठाकूर, यांजकडून :-**

(५) प्र. क्र.१ ईश्वर नगर येथे मुकुंद कंपनी ते आगिवले घरापर्यंत आर.सी.सी. हेवी गटार, पदपथ व डांबरीकरण करण्याची तरतूद करणे. (६) प्र. क्र.१ ईश्वर नगर विभागात क्लस्टर १,२,३,४,५,६,७,८,१२ व खारकर वाडी येथे गटार व पदपथ बांधण्याची तरतूद करावी. (७) प्र. क्र.१ ईश्वर नगर मधील सन २००० सालापासून असलेली सर्व जुनी गटारं नव्याने बांधण्याची तरतूद करावी.

**८ ते १०. सौ. रेखा विनोद म्हात्रे, यांजकडून :-**

(८) प्र. क्र.८९ करावे मधील जय मल्हार चौक ते गणपतशेठ तांडेल चौक रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे. (९) प्र. क्र.८९ करावे मधील जयमल्हार चौक ते गणपतशेठ तांडेल चौक पर्यंत गटाराची सुधारणा करणे. (१०) प्र. क्र.८९ करावे मधील जयमल्हार चौक ते गणपतशेठ तांडेल चौक रस्त्याच्या दोन्ही बाजुच्या पदपथाची सुधारणा करणे.

**११ ते १३. सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**

(११) प्र. क्र. २१ घणसोली अंतर्गत नव्याने विकसित केलेला सेक्टर-२९ मधील भुखंड क्रमांक ६८ ही सामाजिक सुविधेसाठी आरक्षित केलेला आहे तो लवकरात लवकर हस्तांतरीत करुन तरुणांसाठी अद्ययावत व्यायामशाळा बांधणे. (१२) प्र. क्र. २१ घणसोली अंतर्गत नव्याने विकसित केलेला सेक्टर-२१ येथील भुखंड क्रमांक २८ हा सामाजिक सुविधेसाठी आरक्षित केलेला आहे. सदरच्या भुखंडावर प्रभागातील जेष्ठ नागरिकांसाठी अद्ययावत असे जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र बांधणे. (१३) प्र. क्र. २१ घणसोली अंतर्गत नव्याने विकसित केलेला सेक्टर-२१ येथील भुखंड क्रमांक १८ हा सामाजिक सुविधेसाठी आरक्षित केलेला आहे. सदरच्या भुखंडावर परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी सामाजिक कार्यक्रम, लग्न समारंभ, महिलांसाठी हळदी-कुंकु कार्यक्रम व इतर कार्यक्रमासाठी अद्ययावत असे वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था असणारे समाजमंदिर (कोपरखैरणे येथील शेतकरी समाज मंदिराच्या धर्तीवर) जी+३ बांधणे.

**१४ ते १६. श्री. सुरेश शंकर भिलारे, यांजकडून :-**

(१४) प्र. क्र. १६, सेक्टर-८अे येथील भाजी-फळ मार्केटसाठी असलेल्या सिडकोच्या आरक्षित प्लॉट वरती भाजी-मार्केटची मागणी करणे. (१५) प्र. क्र. १६, दिवा सर्कल सेक्टर-९ वंदना बिल्डिंग समोरील खाली जागेचे सुशोभिकरण करणे. (१६) ऐरोली रेल्वे स्टेशन ते ऐरोली ब्रिज मार्गे दादर-मुंबईला जाण्यासाठी नवीन बस मार्ग चालू करणे.

**१७ ते १९. सौ. सुरेखा बंडू पाटील, यांजकडून :-**

(१७) प्र. क्र. १६ येथील दिवागांव व से.९ उद्यानकरिता से.९ येथील हायटेंशन खालील प्लॉट सिडकोकडे मागणी करणे. (१८) प्र. क्र. १६ येथील क्रांतीवीर नानासाहेब पाटील उद्यान से. ८ येथे जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे. (१९) प्र. क्र. १६ येथील से. ९ मध्ये रस्त्याचे डांबरीकरण व फुटपाथ बांधणे.

**२० ते २२. श्री. संदिप बाळकृष्ण सुतार, यांजकडून :-**

(२०) प्र. क्र. ७९ दारावे येथील सेक्टर २५ अरुण बार ते सेक्टर २७ एस.टी.पी प्लॅन पर्यंतचा मुख्य नाला विकसित करुन नालाच्या दोन्ही बाजूला नागरिकांच्या रहदारीसाठी सर्व्हिस रोड व फुटपाथ बांधणे. (२१) प्र. क्र. ७९ दारावे येथील सेक्टर २३ मधील लँडमार्क सोसायटी पासून ते रॅकेट गंगा सोसायटी पर्यंतची मुख्य मलनि:स्सारण वाहिनी पुर्णपणे खराब झालेली असल्यामुळे त्यातील सांडपाणी पुर्ण रस्त्यावर बाहेर येऊन साचून राहते त्यामुळे रोगराई व दुर्गंधी पसरत आहे. तरी लवकरात लवकर सदर ठिकाणी नवीन व मोठी मलनि:स्सारण वाहिनी टाकणे. (२२) प्र. क्र. ७९ दारावे येथील सेक्टर २७ मधील मुख्य रस्ता व इतर आतील सर्व रस्त्याचे फुटपाथ खराब झालेले असून अनेक ठिकाणी तुटलेले आहेत. तरी सेक्टर २७ मधील सर्व फुटपाथ नव्याने विकसित करुन त्यावर इंटरलॉक लावणे.

**२३ व २४. श्री. विक्रम धनाजी शिंदे, यांजकडून :-**

(२३) नवी मुंबईतील संपूर्ण सिडको नोडमध्ये सिडकोने अल्प उत्पन्न गटातील लोकांकरीता बी-२ टाईप, एसएस-१ टाईप, एसएस-२ टाईप, एसएस-३ टाईप, ए- टाईप आणि एलआयजी टाईप अशा घरांची रचना केलेली आहे. परंतु या घरांच्या वाढीव बांधकामाची परवानगी घेताना संबंधित असोसिएशनची तसेच शेजाऱ्यांचा ना हरकत दाखला घ्यावा लागत होता. तेव्हाच वाढीव बांधकाम करण्यास परवानगी मिळत होती. परंतु आता महापालिका अधिकाऱ्यांकडून परवानगी घेताना असोसिएशन, व कंडोनियम अंतर्गत सर्व रहिवाशी यांचा ना हरकत दाखला वाढीव बांधकामासाठी घेण्याची सक्ती करण्यात येत आहे. सदरची बाब योग्य नाही. पुर्वीची प्रक्रिया योग्य होती. नवीन प्रकारे बांधकाम परवानगी घेण्याची सक्ती केल्यास नागरीक बांधकाम परवानगी न घेता अनधिकृतपणे बांधकाम करतील. पूर्वीप्रमाणेच बांधकाम परवानगी घेतल्यास सुनियोजित अशी बांधकामे होतील. व नागरिकांना ते परवडण्यासारखे आहे. वाढीव बांधकाम करण्यासाठी पूर्वीप्रमाणेच कार्यप्रणाली राबवावी. (२४) नवी मुंबईतील संपूर्ण सिडको नोडमध्ये सिडकोने अल्प उत्पन्न गटातील लोकांकरीता बी-२ टाईप, एसएस-१ टाईप, एसएस-२ टाईप, एसएस-३ टाईप, ए-टाईप आणि एलआयजी टाईप अशा घरांना जी+१ अथवा जी+२ अशी बांधकाम करण्यास परवानगी होती. परंतु अशा घरांना बांधकाम करताना नविन नियमाप्रमाणे आता विमानतळ विभागाची परवानगी घेणे सक्तीचे केलेले आहे. तरी सदरचा नियम रद्द करण्यात यावा. यापुर्वी या परिसरामध्ये १० ते २० माळयांच्या इमारतींचे बांधकाम करण्यात आलेले आहे. व त्याठिकाणी नागरीक राहण्यासही आलेले आहेत. त्यामुळे वर उल्लेख केलेल्या (बी-२ टाईप, एसएस-१ टाईप, एसएस-२ टाईप, एसएस-३ टाईप, ए- टाईप आणि एलआयजी टाईप) अशा घरांचे वाढीव बांधकाम करताना त्यांना विमानतळ विभागाची परवानगी घेणे या नियमातून वगळणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**

**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक ११ नोव्हेंबर २०१३.**